# टिपणी

## अमरावती विभाग पदवीधर मतदार संघ, जि.अकोला

पदवीधर मतदार संघासंबधीच्या पदवीधर मतदार यादीचा दिनांक 1/11/2009 या अर्हता दिनांकावर आधारीत विशेष पुर्नरिक्षण कार्यक्रम - 2009-2010

व्दितीय पुर्नप्रसिध्दी दि.4/1/2010

| Sr. NO. | Activities | Period |
|---|---|---|
| 1 | Issue of public notice in the New Papers & Date of Draft publication of Electoral Rolls - 2009 | 08.12.2009 (Tuesday) |
| 2 | Date of commencement of filing claims and objections | 08.12.2009 (Tuesday) |
| 3 | First Republication of notice in News papers | 22.12.2009 (Tuesday) |
| 4 | Second Republication of notice in News papers | 04.01.2010 (Monday) |
| 5 | Period for filing claims and objections | 08.12.2009 (Tuesday) to 18.01.2010 (Monday) |
| 6 | Disposal of Claims and objections by | 08.02.2010 (Monday) |
| 7 | Final publication of rolls | 12.02.2010 (Friday) |

जिल्हाधिकारी तथा सहा.मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी तथा, पदनिर्देशीत अधिकारी, यांचे कार्यालये, तहसिल कार्यालये, शैक्षणिक संस्था, इत्यादी ठिकाणी सविस्तर जाहीर अधिसूचना दि.4/1/2010 रोजी व्दितीय स्वरुपात प्रसिध्द करण्यांत आली आहे.

**पदवीधर मतदारांनी अधिसुचनेतील खालील ठळक मुद्यांची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

1. नमुना-18 मधील विहीत अर्ज उपविभागीय अधिकारी तथा, पदनिर्देशीत अधिकारी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे वेबसाईट www.akola.nic.in . वर अधिसूचना नमुना 18 चे अर्ज उपलब्ध आहेत.
2. अमरावती विभाग, पदवीधर मतदारसंघाच्या मर्यादेत राहणारा भारतीय नागरीक दि.1/11/2009 रोजी तीन वर्षापुर्वी भारतीय विद्यापीठाने दिलेली पदवी अगर तत्सम अर्हता धारण करणारा पदवीधर मतदार यादीमध्ये नांव नोंदविण्यास पात्र असेल.
3. विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थेकडुन दिल्या जाणाऱ्या पदवी, पदविका प्रमाणपत्र मुळ स्वरुपाच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती प्रमाणीत करुन जोडणे आवश्यक आहे.
4. शासकिय निमशासकिय शैक्षणीक संस्था, व सहकारी संस्था या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी अर्जासोबत त्यांच्या कार्यालय प्रमुख /राजपत्रीत अधिकाऱ्यांनी प्रमाणीत केलेल्या पदवि/पदवीका संबंधिच्या सत्यप्रती प्रमाणीत करुन जोडणे आवश्यक आहे.
5. नोंदणीकृत वैद्यकिय सेवेतील, स्थापत्य सेवेतील,चार्टर्ड अकॉऊंटंट, अधियोक्ता यांनी त्यांच्या संस्थेने प्रमाणीत केलेले प्रमाणपत्र मतदार नोंदणीसाठी नमुना-18 सोबत जोडणे आवश्यक आहे.
6. शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थी पदवीधर मतदारासाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेच्या प्राचार्यांनी दिलेले प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
7. विद्यापिठाकडुन ज्यांना पदवीप्रमाणपत्र प्राप्त झाले नाही त्यांनी विद्यापीठाकडुन मिळालेल्या मुळ गुणपत्रीकेची साक्षांकित प्रत सोबत जोडावी.
8. उप विभागीय अधिकारी तथा, पदनिर्देशीत अधिकारी यांचे पिन कोड क्रमांक देण्यांत आले आहेत.

वरील ठळक मुद्यातील नमुद केलेल्या दस्तऐवज नमुना-18 सोबत जोडावे सुनावणीचे वेळी त्यांच्या मुळ प्रमाणपत्रासह तपासणी करिता सादर करणे आवश्यक राहील. तपासणी नंतर मुळ प्रमाणपत्र त्यांनी परत घेण्याची दक्षता घ्यावी.

संबंधित पदविधरांनी उप विभागीय अधिकारी तथा, पदनिर्देशीत अधिकारी, यांचे कार्यालयात नमुना-18 मधील अर्ज दाखल करण्यासाठी आवश्यक दस्तऐवजासह सादर करुन त्याबाबतची पोच प्राप्त करुन घ्यावी. अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक 18/1/2010 आहे याबाबत संबंधितानी नोंद घ्यावी.

उप विभागीय अधिकारी, तहसिलदार, यांचे कार्यालयात प्रारुप मतदार यादी अवलोकनार्थ ठेवण्यात आली आहे. संबधीत पदवीधर मतदारांनी नोंद घेवुन पुर्नरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत पदवीधर मतदार यादी अद्यावत करण्यासंदर्भात प्रशासनास सहकार्य करावे.

ठिकाण :- अकोला
दिनांक :-4/1/2010

जिल्हाधिकारी तथा,
सहा.मतदार नोंदणी अधिकारी
अमरावती पदविधर मतदारसंघ
जि.अकोला